।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# श्री समर्थ रामदास स्वामी स्मृति स्थाने



जांबचे समर्थ मंदिर


**१. <u>जांब</u> :–** ही श्री समर्थांची जन्मभूमी आहे. याला 'श्रीक्षेत्र जांब' म्हटल्या जाते. शके १५३० इ. स. १६०८ चैत्र शु.९ मीला, रविवारी, रामजन्माच्या दिवशीच व वेळेस दुपारी १२ वाजता श्री समर्थांचा जन्म झाला. सूर्याजीपंत व राणोबाईच्या पोटी 'नारायण' जन्मले. त्यांचे जेष्ठ बंधू गंगाधरपंत किंवा 'श्रेष्ठ' या नावाने ओळखले जातात. ठोसर घराण्यातील सूर्याजी त्रिंबक ठोसर ही २३ वी पिढी आणि श्री समर्थांची २४वी पिढी होय. समर्थांना श्रीरामाची कृपा (अनुग्रह) जांबलाच झाल्याचा उल्लेख आहे. शके १५४१, श्रावण शु. अष्टमीला. तेव्हा त्यांचे वय अवघे अकरा वर्षांचे होते. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचे लग्न व्हायचे वेळी ते 'सावधान' शब्द ऐकून जांब वरून पळून नाशिकजवळच्या टाकळीला गेले.

जांब येथील समर्थांचे घर हे पूर्वी कुळकर्ण्यांचा वाडा होता. जवळच श्रीरामाचे मंदिर आहे. जेथे २४ पिढ्यांपासून श्रीरामाची सगुणोपासना होत होती. सध्या त्याच्या राहत्या घरी समर्थमंदिर उभे आहे. हे बृहन्महाराष्ट्राच्या मदतीने शके १८५४ श. चै. ९ला प्राणप्रतिष्ठा करून बांधलेले आहे. जेथे समर्थांची मूर्ति बघतो. तेथेच दोन्ही भावाचा जन्म व आईचे निधन, समर्थांच्या मांडीवर झाले. ह्या मंदिरा शेजारी भक्तासाठी 'श्रीरामविश्रामधाम' म्हणून राहण्याची सोय आहे.




श्रीरामाचे मंदिर

जांब हे गांव घनसांवगी तालुक्यात आहे. घनसांवगीहून पिंपळगाव कुंभारीला जाणाऱ्या एस.टी. घेवून तेथून आटोरिक्षेने जांबला जाता येते. पिंपळगावकुंभारी ते जांब अंतर १० किमी. आहे. पुणे ते परतूर एसटी 'पिंपळगावकुंभारीला' थांबते. परतूर रेल्वे स्टेशनवर उतरूनही मागे २४ किमी. आल्यास जांबला जाता येते. औरंगाबाद, जालना, परतूर येथून राज्य परिवहनाच्या बसेस चालतात. जालना ते जांब १० किमी. रेल्वे मुंबई-नांदेड मार्गाने परतूर स्टेशनला उतरावे. (तपोवन एक्सप्रेस, देवगिरी एक्सप्रेस, नंदीग्राम एक्सप्रेस) पुणे नांदेड एक्सप्रेस मंगळवार/ गुरूवार आहे. फोन श्री समर्थ मंदिर – (०२४६३) २५३०१७. श्री समर्थांची वंशपरंपरा अशी आहे. (१) कृष्णाजी पंत (२) दशरथपंत (३) रामजीपंत (४) हरीपंत (५) निराजी (६) शिवाजी (७) विष्णू (८) बहिणाजी (९) आत्माराम (१०) गणेश (११) धोंडोपंत (१२) आत्माराम (१३) गुंडोपंत (१४) पिराजीपंत (१५) आत्माराम (१६) शिवाजी (१७) विष्णू (१८) केसोपंत (१९) रामाजी (२०) भानजी (२१) सूर्याजी (२२) त्र्यंबकपंत (२३) सूर्याजी (२४) समर्थ




अथ जन्मकुंडली





भावचलित कुंडली



गोमेय मारुती

२. **टाकळी** :- श्री समर्थ येथे १५४२ शकात आले. येथे नंदिनी व गोदावरी नद्याचा संगम आहे. या संगमावरच कंबरभर पाण्यात एकापायावर उभेराहून समर्थांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. म्हणजे १५५४ पर्यंत समर्थ टाकळीत होते. गायत्री मंत्राचा जप पुरश्चरण येथेच केली. सकाळी संगमावर स्नानसंध्या आटोपून प्रार्थना व दुपारी पंचवटीला जाऊन माधुकरी मागावी. ती प्रथम रामाला अर्पण करून प्रसाद म्हणून सेवन करावी. हा नेम बारा वर्षे चालला. जवळच 'गोमेय मारुती'चे मंदिर आहे. हा मारुती गाईच्या शेणाचा तयार केला आहे. सर्वांत पहिला स्थापलेला हा समर्थांच्या हाताचा मारुती होय. पण याची गणना अकरा मारुतीत नाही. नाशिक शहरात पुण्याहून जातांना टाकळीचा रस्ता लागतो. आंत ४-५ किमी गेल्यावर टाकळीमठ म्हटल्यावर कोणीही सांगतात. टाकळी येथील काळातच समर्थांनी वाल्मीकीरामायण हस्ताक्षरात लिहिल्याचे म्हटले जाते. लेखनकाळ - १५४४ ते १५६७ शके १५५४ ते १५५६ हा तीर्थाटनाच्या काळ गेल्यावर कृष्णातटाकी बरेचसे लिखाण झाल्याचे दिसते. त्यांनी केलेल्या तेराकोटी रामनामाच्या जपापैकी ९।। कोटी पुरश्चरणाच्या व तीर्थाटणाच्या काळात झाल्याचे व ३।। कोटी कृष्णातटाकी झाल्याचे नमूद आहे.



श्री समर्थ व शिवाजी राजांची प्रथम भेट

३. **शिंगणवाडी** :- शिंगणवाडी हे क्षेत्र चाफळहून २ ते ३ कि.मीटर आहे. शके १५९४ मध्ये श्रीसमर्थ व शिवरायाच्या प्रथम भेटीचे ते द्योतक आहे. येथे मंदिर स्वरूपाचे पक्के बांधकाम असून आजुबाजूला बगिचा केला आहे. जवळच शिंगणखडीचा मारुतीचे देवालय पण आहे. याला खडीचा मारुती पण म्हटले जाते. हा खडीचा मारुती श्री समर्थांनी स्थापित केला असून ११ मारुतींपैकी एक समजला जातो. श्री समर्थांनी शिवरायाला त्यांचे पत्राचे उत्तर दिले. त्याचा सारांश असा आहे. 'तीर्थाटणाचे काळी उत्तरदक्षिण सारा देश मी पालथा घातला. पण धर्मरक्षणाची चाड एकाही राज्यात पाहिली नाही. ते कदाचित बलवान व समर्थशाली असतील पण ते दिल्लीच्या बादशाहचे मिंधे झाले आहेत. तूच एक पुरुष मला दिसतोय ज्याला धर्मरक्षणाची चिंता लागली आहे. ते रक्षण्याकरिता तुझ्यात शक्ति व युक्ति दोन्ही आहेत. तेव्हा तूच हे संकट दूर कर.'

या अर्थाच्या समर्थांच्या ओव्या पाहा. त्यातून समर्थांना धर्मसंकट निवारण्याची चिंता लागलेली दिसते.

**'या भूमंडलाचे ठांई। धर्म रक्षी ऐसा नाही।**
**मऱ्हाष्टधर्म राहिला कांही। तुम्हांकरितां।।**

४. **श्री क्षेत्र चाफळ** :- बारा वर्षे टाकळीला तपश्चर्या व बारा वर्षे हिंदुस्थानात उत्तरदक्षिण दिशेला तीर्थाटन करून समर्थांनी हिंदुस्थानाचे निरिक्षण केले. समाजाची, धर्माची भयंकर अवनति, ऱ्हास झाल्याचे त्यांना दिसले. शतकानुशतके स्त्रियांवर अत्याचार, देवालयाचा विद्धांस, मूर्तीची विटंबना, लूट जाळपोळ, कत्तल, धर्मांतर इ. भयंकर प्रकार घडत गेल्याने समाजातील धर्माची स्थिती ही फार रसातळाला पोहचल्याचे त्यांचे नजरेस आले. त्यासाठी श्रीरामाची स्थापना करून, उत्सव साजरा करून लोकांची मने सगुणोपासनेकडे वळवावी, एकी निर्माण करून धर्म पुन्हा स्थापित करावा. या अर्थाने त्यांनी चाफळला श्रीराममंदिर स्थापित करण्याचे ठरविले. चाफळचे खोरे, कृष्णातटाकीचा प्रदेश, आदिलशहाच्या अमलाखाली होता. पण शहाजीराजे, दिनायतराव इ. हिंदू राजे यांचे विजापूरात वजन असल्याने चाफळास श्रीराममंदिर उभारले. जी जागा मंदिरासाठी दिली गेली तेथे गावांची स्मशानभूमी होती. म्हसोबाचे देऊळ अजूनही मंदिराचे एका बाजूला दिसते. आजही म्हसोबाला दहीभात, नारळाचा नैवेद्य दिला जातो. शिवाजीराज्यांनी श्रीराममंदिरासाठी मदत देण्याचे कबूल केले तर समर्थांनी ती मदत घेतली नाही. मंदिराच्या बांधकामाला सर्वांचा हातभार लागायला पाहिजे हे धर्माचे, समाजाचे कार्य आहे असे सांगुन

सर्व लोकांनी चाफळला श्रीराममंदिर उभारले. परब्रह्माला विशेष गुण आवडत नाही सहजतेने केलेली पूजा, कार्य जे अभिमानरहित, निष्काम आहे तेच ब्रह्माला, देवाला आवडते. सामान्य गुण, सहजतेचे वागणे हेच देवाला प्रिय आहे. हे मंदिर बांधले त्याचे वर 'श्रीसमर्थप्रताप'मध्ये असे वर्णन आहे.

**'समर्थे देवालये केली सामान्य हस्तें।**
**सामान्य मान्य केली समस्तें।**
**पुढे पुढे कार्यें करितील प्रशस्तें।**
**अनंतहस्ति समर्थ।। स. प्र.**

हाच उद्देश मंदिर बांधण्याचे मागे होता. 'अनंतहस्ति समर्थ' यानेच कार्ये सिद्ध होतात. सामुदायिक प्रार्थना, ऐकी हीच नारायण शक्ति म्हणविली जाते.

चाफळच्या श्रीराममंदिरातील मूर्तीचे वैशिष्ट्य आहे. श्रीसमर्थांना स्वप्नात रामाने सांगितले की, 'कृष्णेच्या डोहांत शिवनाभीत कोणास ठाऊक नसलेली व ब्रह्मकृत मूर्ति आहे. ती काढून तिची स्थापना करावी. तसेच मारुतीनेही प्रकट होऊन आज्ञा केली की रामासमोर माझ्या मूर्तीत तु (रामदास) संचार कर. मंदिराचे मागे हनुमानाची जी प्रतापमूर्ती आहे तीत मी (हनुमान) प्रवेश करीन.

'दासविश्राम धाम' या ग्रंथातील खालील दोन ओव्या याचा पुरावा, ग्वाही देते.

**देवा सन्मुखी तूं चि भक्तोत्तमा। निर्मोन ममाकृती त्यात राही।।**
**सादृश्य तुझा जो असे ध्यानांश। हरिराम हरिरुपी करीं प्रवेश।।**
**येक उरला जो मम तेजांश। श्रीरामामागे स्थापिजे।।**

हनुमानाने यावर भक्तांना आश्वासन दिले की ज्याचा जसा भक्तिभाव असेल तसे त्याचे मनोरथ मी पूर्ण करीन. मग तो भक्त सकामी असो की निष्कामी असो-

**'सकामी निष्कामी कोणी तेथें। करितां पूजन सेवा विध्युक्त।**
**प्रसन्नपणे मी पुरवीन हेत। भक्तिभाव जैसा त्यापरी।।**

'चाफळचा मठ' हा आद्य मठ म्हणविला जातो. तो शके १५८२ मध्ये झाला. येथून समर्थांनी सर्व देशभर श्रीरामसंप्रदायाची सूत्रे हालविली. ही समर्थांची कर्मभूमि म्हणविते.


**श्री समर्थांची समाधी - सज्जनगड**

**५. <u>सज्जनगड</u> :-** श्री समर्थ शिवरायांच्या आग्रहानुसार शके १५९८ ला गडावर राहावयास गेले. समर्थांनी त्याच वर्षी शिवरायांना आज्ञा केली की ठिकठिकाणच्या साधुसंतांना गडावर येण्याकरिता विनंतीपत्र पाठवावे. महाराष्ट्रात भरलेली ही 'पहिली संतपरिषद' होय. संतसज्जनांचा मेळावा. त्याचे स्वागताध्यक्ष स्वत: शिवरायांनी केल्याचे नमूद आहे. वामन, रंगनाथ, जयराम, निंबराज, वेणु, आक्का, उद्धव, कल्याण, आण्णाप्पा, वासुदेव माधव इ.ची कीर्तने झाली. हा अपूर्व सोहळा परळीच्या किल्ल्यावर पार पाडला. तेव्हा पासून किल्ल्याला 'सज्जनगड' हे नाव प्राप्त झाले. श्री समर्थ तंजावरला गेले असता राम, लक्ष्मण, सीता व मारुती या चार मूर्ति तयार करण्यास मल्हार निंबदेव यास आज्ञा केली होती. ह्याच मूर्ति आज सज्जनगडावर आहेत.ज्या ठिकाणी समर्थांची समाधी आहे. तेथेच त्यांचे देहाचे दहन केलेले आहे. १६०३ माघ वद्य ९ शनिवार उत्तरकार्य उद्धवांनी केले. सज्जनगडावर समर्थांच्या समाधीचेवर श्रीरामाचे मंदिर आहे. ह्या मूर्ति समर्थांनी तंजावर येथून आणायला सांगितले होते. जवळच शेजघरात रोजच्या वापरायच्या वस्तू आहेत. शिवरायांनी दिलेला पलंग, हनुमंतांनी दिलेली वल्कले, सोटा, कुबडी, पानाचा डबा इ. वस्तू पाहायला मिळतात. मुख्य मंदिराचे मागे अर्धा किलो मीटरवर धाब्याचा मारुती आहे. कल्याणा छाटी उडाली स्मारक, श्रीधर कुटी, आंगलाईचे मंदिर, वेणा व अक्काचे वृंदावन समर्थावतारातील समर्थांची गाथा यातील घडलेल्या गोष्टी म्हणजे ब्रह्मपिसा, पिकलेल्या आंब्याची गोष्ट, कल्याण छाटी, डाळगप्पू ह्या सज्जनगडावरच घडलेल्या आहेत.



शिवथर घळचा धबधबा

६. **<u>कुबडीतीर्थ</u> :–** शिंगणवाडी जवळच एक ७–८ किलोमीटर हे 'कुबडी तीर्थ' आहे. शिवाजीराजासाठी हे तीर्थ निर्माण केल्याचे सांगतात. येथे समर्थांच्या भेटीकरिता राजे आले असतांना ते दमले होते, त्यांना तहान लागली होती. त्यासाठी समर्थांनी कुबडीने दगड उलटून तेथून पाण्याची संतत धार निर्माण केली. धारेखाली कुंड आहे.

७. **<u>शिवथर घळ (शिवतर घळ)</u> :–** हे ठिकाण भोर ते महाड रस्त्यावर, महाड येण्यापूर्वी २५ किमी. वर बारसगाव फाटा आहे. या फाट्याहून १५ किमी आंत गेल्यावर शिवतर घळ लागते. तेथे भक्तांसाठी राहण्याची सोय आहे. तसेच वर घळीत समर्थ व कल्याणस्वामींचा मूर्ति आहे. बाजूला एक मोठ्ठा धबधबा आहे. रोज पूजा असून दुपारी प्रसाद असतो. इच्छुक साधक येथे मुक्काम करू शकतात. पुणे ते शिवतर घळ साधारणत: १२० किमी. अंतर आहे. या घळीचे महत्त्व म्हणजे येथेच 'श्रीमत्‌दासबोधाची' रचना झाल्याची सांगितले जाते. शके १५७६ ते १५९८ पर्यंत येथे समर्थांचे राहणे झाल्याचे म्हटल्या जाते. घळ सुमारे १२५ फूट लांब व ७५ फूट रुंद आहे. आत बसण्याची जागा आहे. चाफळच्या नंतर शिवतर घळीचा नंबर लागतो. या घळीला 'सुंदरमठ' पण म्हटले आहे.

८. **<u>अकरा मारुती</u> :–** मारुती शक्तीचे, पराक्रमाचे वर्णन वाचल्यावर त्याची बलोपासना कोणाला करावीशी वाटणार नाही. ब्रह्मचार्याचे प्रतीक असलेला, चिरंजीव असलेला, अष्टसिद्धी प्राप्त असलेला, ज्याने भक्ती, शक्ती, युक्ती सामर्थ्याने श्रीरामाची, आपल्या सद्‌गुरुची सेवा केली, जन कल्याणाचे कार्य केले. लोकांनी सुखी व्हावे रामाची भक्ती करावी म्हणून राममंत्र लोकांना दिला. ज्याचे नामोच्चाराने भूत, पिशाच्च कळिकाळ सुद्धा घाबरतो. अशा मारुतीची ऊपासना करणे, त्याची कृपा प्राप्त करणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. गावी, शहरी मारुतीचे मंदिर असतात. वेशीवर हनुमानाची मूर्ती, घराच्या दारावर हनुमानाचे चित्र लोक लावतात, रावणाची लंका जाळली, कोट्यानुकोटी राक्षसांना मारले. म्हणून दक्षिणमुखी मारुतीचे देऊळ लोकांनी उभारलीत. महाभारतात युद्धाचे वेळी, अर्जुनाचे रथध्वजावर मारुती स्वार होऊन बसला आहे. इत्यादी हनुमानाचे गुणगान, सामर्थ्य ऐकले की 'तुम रक्षक काहू को डरना' अशा तुलसीदासांची ओवी आठवते.

श्री समर्थांना मारुतीचा अवतार म्हटले जाते. श्री समर्थ लिहितात मारुतीच्या उपासनेमुळे मला राम दर्शन घडले.

**जिकडे जिकडे जाती भक्त। पाठी जाय हनुमंत।**
**राम उपासना करी। मारुती नांदे त्याचे घरी।**
**दास म्हणे ऐसे करा। सदा मारुती हृदयी धरा।**

चाफळचे श्रीराम मंदिर स्थापना करताना श्री समर्थांना श्री मारुतीने प्रकट होऊन आज्ञा केली होती की रामा समोर माझी मूर्ति स्थापन करून त्यात तू (रामदास स्वामी) संचार कर आणि माझी प्रतापमूर्तीची स्थापना राममंदिराचे मागे कर.

**देवा सन्मुखी तूं चि भक्तोत्तमा। निर्मोन ममाकृती त्यांत राही।**
**सादृश तुझा जो असे ध्यानांश। हरिरुप करी प्रवेश।।**
**येक उरला जो मम तेजांश। श्रीरामामागे स्थापिजे।।**

तसेच मारुतीने सर्वांना आश्वासन दिले की जे भक्त सकाम, निष्काम भावनेनी माझी येथे उपासना करतील त्यांना मी प्रसन्न होऊन त्यांच्या भक्तीभावाप्रमाणे फळ देईन.

**'सकामी निष्कामी कोणी तेथें। करिता पूजन सेवा विध्युक्त।**
**प्रसन्नपणें मी पुरवीन हेत। भक्ती भाव जैसा त्यापरी।।**

भक्तांच्या रक्षणार्थ ब्रह्मांड पालथे घालण्याचे सामर्थ्य हनुमानात आहे व तसाच या प्रताप मारुतीचा अर्विभाव!!

इ.स.१००१ ते १०२७ मध्ये मुगलाच्या काळाला सुरुवात झाली होती. तेथून थेट इ.स. १७०७ औरंगजेबा पर्यंतच्या काळात देवालयाचा विध्वांस धर्मांतर, लूटमार, जाळपोळ, कत्तल, स्त्रीहरण, क्रौयाचे अनितीचे अधर्माचे वातावरण वाढले होते. मूर्तीची विटंबना मंदिराचा उच्छेद, धर्मवाडेपणा या प्रकारामुळे देशाची धर्माची अवनिती झाली होती. धर्मावस्था अत्यंत ढासळली होती. अशा परिस्थितीत हनुमानासारखे पाठीराख करणारे एकच दैवत समर्थांचे समोर होते. त्याच्या उपासनेतून

भक्ती, शक्ती, युक्तीने धर्मस्थापनेचे कार्य पार पडण्याचे भविष्य समर्थांना स्पष्ट पणे दिसू लागले होते. यास्तव लोकांमध्ये श्रीरामाची भक्ती जागृत करावी. लोकांना एकत्रित करून उपासनेला लावावे, सोबत मारूती सारखे बलोपासनेचे दैवत असावे ही कल्पना समर्थांनी प्रत्यक्षात उतरविली. श्रीरामाचे हजारो मठ स्थापित केले. त्याच बरोबर श्री समर्थ स्थापित अकरा मारुती सुद्धा आहेत. या व्यतिरीक्त श्री समर्थांनी जेथे तपश्चर्या केली ते ठिकाण नाशिक जवळची टाकळी होय. येथील 'गोमेय मारुती' जो गाईच्या शेणानी बनविला आहे. तो सर्वप्रथम आहे पण त्याची गणना अकरा मारुतीत नाही. गोदावरी व नंदिनी नदीच्या संगमावर अर्धा किलोमिटर अंतरावर हा मठ आहे. अजूनही मारुती मूर्ति स्वच्छ, सुंदर, तेजस्वी पाहायला मिळते. श्री समर्थांचा तपश्चर्येचा काळ शके १५४२ ते १५५४ समजला जातो. या काळातच ही 'गोमेय मारुतीची' मूर्ति स्थापित झाली असावी. श्री समर्थांचे शिष्य उद्धव यांचे मठ दोन ठिकाणी आहेत. एक टाकळीस व दुसरा तेलंगणात इंदूरबोधन गावी दोन्ही ठिकाणी समर्थ स्थापित मारुतीचे मंदिर आहेत. पण यांचा उल्लेख अकरा मारुतीत करीत नाही.

कै. नानासाहेब देव ह्याच्या श्री समर्थावतरात नोंद केल्याप्रमाणे अकरा मारुती हे शके १५६६ ते १५७६ च्या दरम्यान स्थापित केले आहे. याची नोंद वाग्देवी मंदिरातील बाडांग ३५३ मध्ये आहे. अकरा मारुतीचे ठिकाण व स्थापित शके पुढे देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | शहापूर | शके १५६६ |
| १ | मसूर | शके १५६७ |
| ३ | चाफळ | शके १५७० |
| १ | उंब्रज | शके १५७१ |
| १ | माजगांव | शके १५७१ |
| १ | बहे | शके १५७३ |
| १ | मन पाडळे | शके १५७३ |
| १ | पारगांव | शके १५७४ |
| १ | शिराळे | शके १५७६ |

या अकरा मारुतीचा उल्लेख श्री समर्थ प्रताप ग्रंथात आहे तो असा,

**बाहो ग्रामी शक्तिग्रामी। मसुराग्रामी पूर्वग्रामी।**
**उंदबरग्रामी शृंगग्रामी। हनुमान स्थापिले समर्थे।**
**बाहोग्रामीउपग्रामी स्थान। मानसग्रामी पारगरामी हनुमान।**
**अधिष्ठांनी महारुद्र मुख्य प्राणनाथ निधान।**
**पूर्व पश्चिमे स्थापिले समर्थे।।**

श्री समर्थांच्या शिष्या वेणाबाईने सुद्धा त्यांच्या ओव्यात अकरा मारुतीचा उल्लेख केला आहे.

**चाफळा माजी दोन उंब्रजेसी येक ।**
**पारगांवी देख चौथा तो हा ।।१।।**
**पांचवा मसुरी शहापूरी साहवा ।**
**जाण तो सातवा शिराळ्यात ।।२।।**
**सिंगणवाडी आठवा मन पाडळे नववा ।**
**दहावा जाणावा माजगावी ।।३।।**
**बाह्यात अकरावा येणे रीती गावा ।**
**सर्व मनोभावा पुरवील ।।४।।**
**वेणी म्हणे स्वामी रामदास समर्थ ।**
**कीर्ती गगनात न समाये ।।५।।**

श्री समर्थ शिष्य अनंत कवि यांना सुद्धा अकरा मारुतीचा उल्लेख त्याच्या काव्यात केला आहे.

**जेणे रुद्र दहा मनोहर जगी येकागळे स्थापिले ।**
**प्रत्येकी अकरा बिघे नृपतीच्या मुद्रांकिती अर्पिले ।**
**त्या त्या नागरिका जना नवविधा भक्तीसि लावीतसे ।**
**ऐसा सद्गुरु जो अनंतकविचा बद्धासि तारीतसे ।।**

श्री समर्थांनी अकरा मारुतीच का स्थापन केले? असा प्रश्न बराचशा लोकांच्या मनात येतो. मारुती अकरा पेक्षा ही जास्त स्थापित केले असतील. पण यावर दिलेल्या अकरा मारुतींना विशेष महत्त्व आले आहे. या अकराचा शोध लागत नसल्याचे आनंदवन भुवनी काव्यात सापडते.

**आक्रा आक्रा बहु आक्रा । माप आक्रा कळेचिना ।**
**गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवन भुवनी ।।**

अकरा आकडा कसा शुभ आहे याचे काही संदर्भ सापडतात. पण वरच्या काव्यात अकरा शब्दांचा अर्थ कोणी स्पष्ट केला नाही.

गीतेत श्रीकृष्णांनी आपल्या विभूती सांगतांना श्लोक क्र.१०.२३ मध्ये अकरा रुद्रांमध्ये शंकर मी आहे असे सांगितले आहे. श्री शंकर हे कर्मसंन्यासी, तपस्वी म्हणविल्या जातात. ज्यांनी सर्व सिद्धी प्राप्त करून सुद्धा त्या बाजूला सारल्या होत्या. सगळ्या रुद्रांमध्ये कामाचा शत्रू शंकर म्हणून माझी विभूती आहे असे म्हटले आहे. हनुमानाला शंकराचा पुत्र महारुद्र समजले जाते. दासबोधात अकरावा दशकाचे नाव भीमदशक आहे. संदर्भ तोच, हनुमान बलभीम हा अकरावा महारुद्र म्हणवितो म्हणून. गीतेची खरी सुरुवात म्हणजे श्री कृष्णानी अर्जुनाला केलेला उपदेश हा अध्याय २ श्लोक ११ पासून सुरू होतो. गीतेतच श्लोक १०.२२ मध्ये ज्ञानेश्वरीतील ओवी क्र.१०.२२४ मध्ये इंद्रियांमध्ये असणारे मन हे अकरावे असून ती माझीच विभूती आहे असे लिहिले आहे. याचा उल्लेख मनुस्मृतित इंद्रिय निग्रहात केला आहे. ‘एकादशं मनो’ म्हणून. यज्ञामध्ये प्रगट होणाऱ्या अग्निला रुद्र म्हटले आहे. संस्कृतमध्ये आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञानाला ‘ज्ञानाग्नि’ म्हटले आहे. हा ज्ञानाग्नि देहात पेटल्यानेच सर्व पापेही त्या अग्नित भस्म होतात. असा हा रुद्र. अकरा रुद्रातील शंकराला रुद्र म्हणून संबोधले जाते. शंकराचा पुत्र हनुमान ज्याची प्राप्ती माता अंजनी व पिता केसरी यांनी शंकराची आराधना करून प्राप्त केले होते. शंकराची उपासना करणारे भक्त रूद्राची उपासना म्हणून लघुरुद्र, महारुद्र करतात. रुद्रामध्ये नमक व चमक असे दोन भाग आहेत. प्रत्येक भागात अकरा अकरा अनुवाक आहे. देहात पंचप्राण (प्राण, अपान, उदान, व्यान, समान) व पाच अंगभूत प्राण (देवदत्त, धनंजय, नाग, कूर्म व कृकल) असे मिळून दहा प्राण व ह्या प्राणांना आधारभूत सुषुम्ना नाडी मिळून एकादश (अकरा) होतात. या अकराचा संबंध प्राण म्हणजे वायू अर्थात पवनपुत्राशी संबंधित आहे. असे हे अकरा मारुती होय. गणितशास्त्रज्ञाच्या मते एक हा आकडा मूळ क्रमांक (प्रायमरी क्रमांक) म्हणवितो. अकरा म्हणजे दोनदा एक असा शुभ मूळांक समजला जातो. या कारणास्तव अकरा हा आकडा शुभ असावा. तसेच श्री समर्थ स्थापित अकरा मारुती सुद्धा. चाफळच्या श्रीरामसमोर असलेली मारुतीची मूर्ती ही हातजोडून उभी आहे. म्हणून याला दास मारुती म्हणतात. इतर मारुतीच्या समर्थस्थापित मूर्तित एक सारखे पणाची खूण दिसते. ती अशी की पायाखाली राक्षसाला तुडविलेला व एक हात वर मारण्याकरिता केलेला, पुच्छ पिळाने डोक्यामागे घेऊन त्याचा आकडा केला आहे. अकरा मारुतीला जाण्यासाठी रस्ते जवळपास पक्के डांबरी केले आहेत. कार थेट मंदिरापर्यंत जाते. एस.टी. त्याच्या नियोजित थांब्यावर थांबतात. मंदिरापर्यंत पायी चालावे लागले अथवा काही वाहन उपलब्ध असल्यास उपयोगात आणता येईल. पुण्याहून प्रायव्हेट कंपनीचे टूर दर शनिवार / रविवार निघून ते वाटेत कोल्हापूर व नरसोबाची वाडी करून परत पुण्यात आणतात. मध्ये एक रात्री कोठेतरी मुक्काम होतो. अकरा मारुतीची ठिकाणे व अंतर दाखविणारा नकाशा मागे जोडला आहे. अकरा मारुतीची माहिती ही कोणत्याही क्रमाने न देता पुण्याहून कोल्हापूरकडे जायला निघाल्यावर वाटेत ही गावे येतात. कारनी जाणे सोयीस्कर पडते त्यानुसार दिली आहे.



वीर प्रताप मारुती चाफळ

***

## चाफळचे मारुती

चाफळ हे गाव उंब्रज पासून १० किलोमीटर वर आहे. तेथे माण नावाची छोटी नदी आहे. सातारा व उंब्रज चाळीस किलोमीटर असून ते कोल्हापूर रस्त्यावर आहे. चाफळला उंब्रजहून जाण्याकरिता प्रायव्हेट जीप, टेम्पो मिळतात. उंब्रजहून चाफळसाठी एस.टी. पण आहे. चाफळला एकंदर तीन समर्थ स्थापित मारुती आहे. एक दासमारुती रामाच्याच



**दास मारुती चाफळ**



**शिंगणवाडीचा मारुती**

मूर्तीसमोर आहे. दुसरा प्रताप मारुती जो राम मंदिराचे मागे एक भव्य मंदिरात असून जवळजवळ पाचशे फुट दूर आहे. तिसरा खडीचा मारुती जो शिंगणवाडीला आहे. शिंगणवाडी हे खेडे चाफळ पासून तीन किलोमीटरवर असून लहान्या टेकडीवर खडीच्या मारुतीचे मंदिर आहे. शिंगणवाडीलाच शिवाजी व श्रीसमर्थांची पहिली भेट झाली होती. तेथे एक स्मारक पण बांधले आहे. इतर पुस्तकात रामघळ हे समर्थांचे चिंतनाला बसण्याचे ठिकाण व कुबडीतीर्थ असल्याचा उल्लेख करतात. पण तेथे सध्या काहीही सापडत नाही. (सन २०११)

***



**माजगावचा मारुती**

**माजगावचा मारुती**

माजगाव हे गाव चाफळला जातांना रस्त्यातच लागते. चाफळहून उलटे उंब्रजकडे येत असताना साधारणत: तीन किलोमीटर वर माजगाव खेडे आहे. रस्त्याच्या लगतच मंदिर आहे. देवळात बाहेर बसण्याची सोय आहे. माजगावचा मारुती असे त्याचे नाव पडले आहे.

***


उंब्रजचा मारुती

### उंब्रजचा मारुती

सातारा कोल्हापूर रस्त्यावर उंब्रज हे गाव आहे. चाफळचा मठ हा श्रीसमर्थांचा मुख्य मठ असल्याने भक्त प्रथम चाफळला जाऊन श्रीरामाचे व तीन मारुतीचे दर्शन घेऊन परत उंब्रजला आल्यावर उंब्रजच्या मारुतीचे दर्शन घेतात. मंदिराच्या जवळ कृष्णनदीचा घाट आहे. पण आजकाल धरणे बांधली गेली असल्यामुळे नद्यांना पाणी फार थोडे नावापुरते सापडते. मंदिर जुने व पडके वाटते. ग्रामपंचायतने काही मंदिराची निगा राखली नसावी. येथे दासबोधाचे पारायण करताना लोक पाहायला मिळतात. नदीतल्या खडकावर हनुमानाच्या पाऊलाची खूण व त्रयोदशीमंत्राच्या खुणा आहेत असे म्हणतात. पण कालांतराने नष्ट झाल्या असाव्यात. ठोस आधार सापडत नाही.

***


मसुरचा मारुती

### मसुरचा मारुती

पुण्याहून अकरा मारुतीच्या दर्शनाला निघालेल्या भक्ताला उंब्रजनंतर मसूर गाव जवळ पडते. उंब्रजला बंगलोर हायवेवर आल्यावर ५-६ किलोमीटर मसूरला जाण्याकरिता डावीकडे रस्ता लागतो. त्या रस्त्याने गेल्यास मसूर गाव जवळपास १५ कि.मी. आहे. मसूरचा मारुती म्हणूनच याची ओळख आहे. याला महारूद्र मारुती पण म्हटले जाते. मंदिर एकदम गावात आहे. कारसाठी पण रस्ता थोडा अरुंदच आहे. मोठी गाडी मंदिरापर्यंत जाऊ शकत नाही. मसुर गावी मुगलांचे राज्य असल्याचे दिसून येते. मंदिरातील उत्सव, निगा, गावाप्रमाणे जेमतेम ठेवली आहे.

***

### शहापूरचा मारुती


शहापूरचा मारुती

मसूर ते कऱ्हाड राज्य मार्गावर शहापूर हे गाव जवळपास ३-४ कि.मी. आत आहे. मसूरकडून कऱ्हाडला जाताना ३-४ कि.मी. वर डावीकडे रस्ता जातो. सरळ रस्ता कऱ्हाडला जातो. येथून कऱ्हाड हे १५ कि.मी. आहे. शहापूरचा मारुती पहिला स्थापित केल्याचे म्हटले जाते. हे गाव आदिलशाहीत होते. मंदिर चांगले बांधलेले आहे. शहापूरच्या कमलाकर कुलकर्ण्यांची गोष्ट समर्थावतार मध्ये वाचायला मिळते. श्री समर्थ शहापूरला भिक्षा मागायला जात असत. पण त्यांचा तो वेश पाहून स्त्रियांना ते आवडत नसत. बरेचदा 'आमच्या दारी येत जाऊ नका. भरल्या घरात राम म्हणू नका' अशा शब्दात स्त्रियांनी श्री समर्थांना सांगितले आहे. पण एकदा श्री समर्थ कमलाकरच्या घरी गेले असता तेथे बायांचा गलबला दिसला. त्या चिंतातूर होऊन बसल्या होत्या. विचारण्याअंती कळले की कमलाकरला हिशोबात चूक झाल्यामुळे बादशहाच्या हुकूमाहून धरून बिजापूरला नेले आहे. कमलाकरची पत्नी सती बाई अक्षरश: रडत होती. इतर बायका तिचे

सांत्वन करीत होत्या. श्री समर्थांनी सांगितले की काळजी करू नये. आजपासून अकरा (परत अकरा) दिवसांनी तुमचे घरधनी श्रीरामाच्या कृपेने परत येतील? असे सांगून निघून गेले. तिकडे बादशहाच्या दरबारी त्याच्या अधिकाऱ्याला एका गोसाव्याने हिशेब समजावून सांगितला व कमलाकराची सुटका झाली. कमळाकर व गोसावी परत शहापूरला यायला निघाले. कमलाकरने गोसावी कोण, कुठला विचारले तर तुमच्या घरच्यांनी मला पाठविले असे सांगून समर्थ निसटले. घरी कमलाकर येऊन पोहचतो तो बरोबर अकरावा दिवस होता. पत्नीस विचारले तर आम्ही कोणी गोसाव्याला पाठविले नाही असे ती बोलली. तो गोसावी रामनामाचा जप करीत भिक्षा मागायला येत होता. पण स्त्रियांनी त्याला येऊ नको असे म्हटल्यावर ते आजकाल दिसत नाही. कमलाकरच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्याला श्री समर्थांच्या दर्शनाची उत्कंठा लागली होती.

***

## बहेगावचा मारुती



**बहेगावचा मारुती**

शहापूरहून कऱ्हाडला यावे. तेथे राहण्याची जेवणाची उत्तम व्यवस्था आहे. कऱ्हाडहून पुन्हा बंगलोर हायवे धरून कोल्हापूरच्या दिशेने गेल्यावर कासेगाव डावीकडे लागते. तेथून तांबवे मार्गे बहेला जाता येते. अन्यथा पुढे पेठ गावाहून डावीकडे इस्लामपूर मार्गाने पण बहेला जाता येते. व्हाया पेठ मार्ग दूरचा पडतो. पण व्हाया पेठ गेले काय आणि व्हाया कासेगाव तांबवे गेले काय. बहेच्या मारोतीचे दर्शन घेवून पुन्हा पेठलाच यावे लागते. कारण येथूनच बत्तीस शिराळ्याला जावे लागते.

बहेगावच्या मारुतीची एक आख्याइका आहे. रावणाचा वध करून जेव्हा राम, सीता, लक्ष्मण व हनुमान परत अयोद्धेला निघाले होते तेव्हा कृष्णेकाठी असलेल्या बहेगावी थांबले होते. कृष्णतीरी राम शिवपूजेसाठी बसले होते. सीतेला शीरटे गावी सोडले होते. लक्ष्मणाची पण रामाबरोबर समाधी लागली होती. इतक्यात एक अद्भूत घटना घडली. कृष्णेला अचानक पूर आला. रामाची समाधीमध्ये व्यत्यय येणार हे पाहून हनुमानाने भीमरुप धारण केले. कृष्णेच्या पात्रात मधोमध उभे राहून कृष्णा नदीचा प्रवाह दोन्ही बाहुंनी दुभागीला. जेणेकरून राम ज्या बेटावर (खडकावर) समाधीस्त होते त्यांना पुराचा व्यत्यय येणार नाही. नदी दोन्हीकडे दुभागल्या गेली. त्याच बेट वर, खडकावर शिवलिंग व मारोतीचे मंदिर आहे. गावाला बहे (बाहे) नाव देण्यात आले.

श्री समर्थ ही घटना वाचून बहेला हनुमानाचे दर्शन, शिवाचे दर्शन घ्यायला आले. त्यांनी पाहिले की तेथे हनुमानाची मूर्तिच नाही. स्वत: आश्चर्यचकित होवून तेथेच मारुतीची प्रार्थना सुरू केली. रामासमोर मारुती नाही म्हणजे नवलच. कृष्णेतून हनुमानानी श्री समर्थांच्या प्रार्थनेला होकार दिला. श्री समर्थांनी डोहात उडी मारुन डोहातून हनुमानाची मूर्ती बाहेर काढली व तेथे स्थापित केली. श्री समर्थांच्या या अर्थाच्या ओव्या त्याच्या वाङ्मयातून देत आहे.

**उभा राहिला भीमरुपी स्वभावें । बळे तुंब तो तुंबिला दोन गावे ।।**
**नदी एक विभागली दोन्ही बाहे । म्हणौनी तया नाव हे गावबाहें ।।१।।**
**हनुमंत पाहावयालागिं आलो । दिसेना सखा थोर विस्मित जालो ।**
**तयावीण देवालये ती उदासे । जळांतून बोभाइला दास दासे ।।२।।**

यावरून देव भक्ताचे रक्षणाकरिता संकटे आली की धावून येतात हे दिसून येते. डोहात श्री समर्थ काही वेळ असल्याने तेथून त्यांना मूर्तिसह हनुमंताने बाहेर काढले असे म्हटले जाते. बाहेचा स्पॉट पाहण्यासारखा आहे. कृष्णेवर पूल असून पुलाच्या एका बाजुने मंदिरात जाता येते. नदीच्या पात्रात मधोमध मंदिर आहे. जाण्यासाठी रस्ता बांधलेला आहे. मंदिराच्या चारी बाजूनी ओटा बांधून काढला आहे समोर छोटी बाग आहे. बसून डबे खायची सोय आहे. मंदिर परिसर स्वच्छ पवित्र आढळतो.

***



शिराळेचा मारुती

**शिराळेचा मारुती**

कऱ्हाड बंगलोर हायवेवर पेठ गावापासून उजव्या हाताला बत्तीस शिराळे गाव आहे. पेठ ते शिरोळे १४ कि.मी. आहे. बस स्टँडजवळच मारुतीचे मंदिर आहे. बत्तीस शिराळे हे नागाच्या खेळासाठी प्रसिद्ध आहे. येथे वीर मारुतीची मूर्ती आहे. मंदिर उत्तम स्थितीत बांधलेले असून मंदिराला लागूनच पूजाऱ्यांची घरे आहेत. पुजा नित्यनेमाने व उत्सवाला होत असते.

***



पारगावेचा मारुती

**पारगावचा मारुती**

पारगावला जाण्याकरिता शॉर्ट कट म्हणजे शिराळ्याहून मांगले, कोंडोली, वारणा मार्गे जाता येते. रस्ता थोडा कच्चा आहे. खड्डे आहेत. अंतर अठ्ठावीस कि.मी. असले तरी कारनी जायला वेळ लागतो. अन्यथा शिराळ्याहून परत पेठ ला यावे. पेठ ते वारणा व वारणाहून पारगांव असा पक्का रस्ता घ्यावा. मारुतीचे मंदिर जुन्या पारगावात आहे. रस्त्याचे एका बाजूला जुने व दुसऱ्या बाजूला नवे पारगाव आहे. मंदिर गावातच आहे. रस्ते लहान आहेत. पण छोटी कार जाते. मंदिर पक्के बांधले असून रोज पुजा अर्चा होत असते.

***



मनपाडळेचा मारुती


**मनपाडळेचा मारुती**

पारगावातून मुख्य रस्त्यावर आल्यावर दुसऱ्या बाजूला नवे पारगाव आहे. या नव्या पारगावातून एक रस्ता मनपाडळेला जातो. पारगाव मनपाडळे अंतर ७ कि.मी. आहे. मनपाडळे ची मारुतीची मूर्ती सर्वात लहान म्हणजे दीड ते दोन फूट उंचीची आहे. इतर मूर्तीपेक्षा ही मूर्ती भिन्न स्वरूपाची बसकी वाटते. मनपाडळेहून कासारवाडी टोपे मार्गे कोल्हापूर जवळपास तीस कि.मी. आहे किंवा मनपाडळे ते अंबप पंधरा कि.मी. व अंबप ते कोल्हापूर पंधरा कि.मी. आहे. स्वत: कारने निघून एका दिवसात अकरा मारुतीचे दर्शन होवू शकते. थोडा ताण पडतो. रात्री कोल्हापूरला मुक्काम करून दुसऱ्या दिवशी परतीचा प्रवास होतो. अंतर व ठिकाणाच्या नावाकरिता नकाशा पहावा :-

अंतर कि.मी.मध्ये,

| | | | |
|---|---|---|---|
| पुणे ते सातारा | १२५ | सातारा ते उंब्रज | ४० |
| उंब्रज ते चाफळ | १० | चाफळ ते शिंगणवाडी | ०३ |
| उंब्रज ते मसूर | १० | मसूर ते शहापूर | ०४ |
| मसूर ते कऱ्हाड | १५ | कऱ्हाड ते कासेगाव | १५ |
| कऱ्हाड ते पेठ | २६ | कासेगाव ते बाहे | १० |
| बाहे ते पेठ | २० | पेठ ते शिराळे | १४ |
| शिराळे ते मनपाडळे | ३० | मनपाडळे ते पारगाव | ०७ |
| पारगाव ते अंबप | १५ | अंबप ते कोल्हापूर | १५ |

***




अकरा मारुतीचा नकाशा

**१०. <u>श्री समर्थवाग्देवता मंदिर धुळे</u> :-** याची स्थापना कै.शंकर श्रीकृष्ण देव ऊर्फ नानासाहेब यांनी सन १९३५ मध्ये केली. श्रीसमर्थ, श्रीशिवराय आणि लोकमान्य टिळकांच्या पासून राष्ट्रधर्म प्रेरणा घेऊन सत्कार्योत्तेजक सभा इस १८९३ मध्ये धुळ्याला स्थापन केली होती. श्रीसमर्थ वाङ्मय शुद्ध रूपात संशोधनपूर्वक महाराष्ट्राला देण्याचे श्रेय, हे एकमेव ध्येय या सभेचे आहे. श्रीदेवांनी सर्व रामदासी मठातील कागदपत्रे, पोथ्या, वाडे श्री वाग्देवता मंदिरात स्थापून संग्रहीत केलेली आहे. इस १९३२ मध्ये जांबेला श्रीसमर्थमंदिर बांधले व १९१० मध्ये शिवधर घळ शोध लावला. श्री समर्थांच्या खुद्द हातचे पृथ्वीतलावरचे एकमेव पत्र, कल्याणस्वामीने रेखाटलेली हनुमानाचे चित्र इ. पुरातन, बहुमोलाच्या वस्तू, लेख येथे संग्रहीत आहे.

## <u>११. श्री समर्थ स्थापित मठ व घळी</u>

(ही माहिती कै.नानासाहेब देव यांनी लिहिलेले पुस्तक 'श्रीसमर्थावतार' व श्री प्रमोद संत यांनी लिहिलेले पुस्तक 'समर्थ स्थापित दैवते' यावर आधारित आहे.)

श्री समर्थांनी संपूर्ण भारतात जवळपास अकराशे मठ स्थापित केले होते. या मठातून, महंताद्वारे जनतेस ज्ञान व बलोपासनेचा धडा शिकविला जायचा. त्या काळी छापखाने, कागद, शाई ह्या गोष्टी नसल्याने शिष्य या मठात बसून हस्तलिखिताच्या प्रति काढत असत. ग्रंथाचा संग्रह मठात करीत असत.कै.नानासाहेब देवांनी या मठांना समर्थ विद्यालयाची उपमा दिली आहे. ज्या मठांचा उल्लेख समर्थ वाङ्मयात झाला आहे. त्यांचे नाव व मठाधिपतीचे नावखाली देत आहे. या मठाला चालविणारा मठाधिपती म्हणजे समर्थांचा 'महंत' होय. जो निस्पृह, उदासिन असून जन कल्याणार्थ आपले जीवन कंठीत असे. लोकसंग्रहाचे कामसुद्धा या मठाद्वारेच व्हायचे. महंताची लक्षणे जी समर्थांनी दासबोधात लिहिली आहे. ती अशी-

**मुख्य हरिकथा निरूपण। दूसरे ते राजकारण।। ११.५.४**
**हरिकथा निरूपण। नेमस्त राजकारण।। ११.६.४**

धर्मस्थापनेच्या कामात प्राधान्य हे 'हरिकथा निरुपणाला' होते. जर निस्वार्थ कार्य केले नाही तर जगदोद्धार कसा व्हायचा? यास्तव

**आधीदेखिल देहधारी। मग पाहावे जगदांतरी**
**तयाचेनि उपरी। परब्रह्म पावे।। ११.९.२०**

प्रथम आत्मोद्धार नंतर जगदोद्धार करावा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. मठ | - | मठाधिपति | ८. तडवळे | - | जगन्नाथ महाराज |
| २. बडोदा | - | कै.रामदास दादा महाराज | ९. एक्केहाळी | - | आत्माराम |
| ३. तंजावर | - | भीम स्वामी | १०. टाकळी | - | उद्धव |
| ४. तिसगाव | - | दिनकर स्वामी | ११. चाफळ | - | खुद्द समर्थ |
| ५. मन्नारगुडी | - | मेरू स्वामी, अनंत मौनी | १२. तेलंगणा इंदूर बोधन | - | उद्धव |
| ६. शिरगाव | - | भीम स्वामी, दत्तात्रय, कल्याण | १३. उंब्रज | - | केशवस्वामी |
| ७. आपचदंमठपति | - | शिवराम स्वामी, (कल्याण शिष्य) | १४. मिरज | - | वेणाबाई |

(या मठाचा उल्लेख 'श्रीसमर्थावतार' पुस्तकात आलेला आहे जे कै. नानासाहेब देवांनी लिहिलेले आहे.)

**१. <u>चाफळचा मठ</u> :-** चाफळचा मठ हा आद्य व मुख्य मठ होय. येथेच समर्थांचे जास्त वास्तव्य होते. चाफळ ही समर्थांची कर्मभूमी समजली जाते. येथूनच त्यांनी सर्व देशभर पसरलेल्या रामदासी पंथाची सूत्रे हलविली. येथे साक्षात राम आहेत, हनुमंत आहेत व समर्थपण आहेत. ज्याकाळात स्त्रीयांवर अत्याचार होत होते, त्यांना भ्रष्ट केले जात होते, मंदिरे उद्धस्त केली जात होती अशा काळी समर्थांनी चाफळला राममंदिर उभारले. रामाची स्थापना केली. उत्सव सुरू केला. पण ह्या आधिष्ठानाची भक्ति ही परंपरा अखंड कशी सुरू राहील यांची चिंता समर्थांना होती. स्थापनेच्या समारंभाच्या दिवसात त्यांनी चाफळचे अधिकारी नरसिंगराव अंबरखानी, देशमुख प्राणजी, देशकुलकर्णी नागोपंत, नाईकवाडी नागोजी भावे व नाणेघोळकर अशा पाच जणांना बोलावून 'या अधिष्ठानाची परंपरा करावी, सर्व साह्यता करावी.' अशी प्रतिज्ञा श्रीरामाच्या पुष्पावर हात ठेवून घ्यायला लावली होती. फक्त पाच जणांवरच ह्या संस्थानाची जबाबदारी जात नाही तर संपूर्ण महाराष्ट्रीयांवर श्रीरामाच्या भक्तीची परंपरा चालवायची जबाबदारी आहे. हे वाचकांनी लक्षात ठेवावे. श्रीरामजन्म उत्सवात कोणाच्या काय जबाबदाऱ्या आहेत हे समर्थांनी ठरवून दिले होते.

**'प्रतिपदेसी मानकरी शाहापूरकर।**
**द्वितीयेस मानकरी वडगावकर।**
**तृतीयेदिवशी मानकरी महागावकर।**
**चतुर्थी भेडसगावकरांची।।**
**पंचमीशी सन्मान श्री आळयकरी।**
**षष्ठीसी भक्तराज नृसिंहराव अधिकारी।**
**सप्तमीसी बहुमान पारगावकरी।**
**अष्टमीबाहेकरांची कथा।**
**मुख्य नवमी दिवस समर्थ महंतांचा।**
**दशमी दिवस चाफळी दीपाराधना रथोत्सवाचा।**
**प्रतिपदेपासून प्रारंभ यात्रेचा।**
**नित्यानंद पद्धती।।.................. श्री समर्थ प्रताप.**

इतकेच नव्हे तर भिंती कोणी सारवाव्या, सफेदी कोणी द्यावी, चित्रे कोणी काढावी, स्वयंपाक घरातील कामे सुद्धा वाटण्यात आली होती. देवाची पालखी उचलताना पुढचे भोई कोण, मागर्च भोई कोण, चोपदार कोण इ.इ. शके १५६९ मध्ये आंगापूरचे डोहातून मूर्ती काढून शके १५७० मध्ये उत्सवाला प्रारंभ झाला. श्री समर्थांच्या कृपाछत्राखाली 'चाफळचा मठ जणू कल्पवृक्षच बनला होता. त्या वृक्षाला बाराही महिने भक्ती ज्ञानाची फळे येतात.' असे उद्‌गार श्री कै. नानासाहेब देवांनी काढले आहे.

**२. <u>इंदूर बोधनचा मठ</u> :-** निजामाबादचे मूळ नाव इंदूर बोधन आहे. इंदूर व बोधन अशी दोन गावे आहेत. बोधन या मोठ्या गावाजवळ इंदूर हे लहान गाव म्हणून 'इंदूर बोधन' त्यास म्हटले जात असे. नांदेड निजामबादला बसनी जाताना प्रथम बोधन व नंतर इंदूर ही गावे लागतात. जवळच सारंगपूर आहे. तेथे समर्थांनी प्रताप मारुतीची स्थापना केल्याची हकीगत आहे. त्या काळी आंध्र प्रदेशावर दुष्काळाचे सावट होते. तेथील मुसलमान अधिकाऱ्याने ब्राह्मणांना जबरदस्तीने वेठीस धरून पाऊस पडण्याकरिता प्रार्थना करायला लावली. ते ब्राह्मण कोरड्या तलावात उभे राहून २-३ दिवसांपासून प्रार्थना करून राहिले होते. समर्थ दक्षिणेकडे प्रचाराला निघाले असताना त्यांनी ते पाहिले. समर्थांनी ब्राह्मणांना 'मी सांगतो तसे करा म्हणजे तुमचे अनुष्ठान सफल होईल' असे म्हणाले. एका मोठ्या दगडावर समर्थांनी कोळशाने प्रताप मारुतीचे चित्र काढले व आपल्या छाटीने झाकले. समर्थ म्हणाले पाण्यातील अनुष्ठान बंद करून या मारुतीला रुद्राचा अभिषेक करा. अभिषेक पूर्ण होताच पाऊस पडेल. समर्थांचा तेज:पुंज चेहरा, बोलण्यातील आत्मविश्वास पाहून पाहून ब्राह्मणांना धीर आला. त्यांनी समर्थांनी सांगितल्या प्रमाणे केल्या बरोबर अर्ध्या तासातच पाऊस पडला. समर्थांनी दगडावरची छाटी दूर करताच त्या दगडावर हनुमंताची मूर्ती प्रगट झाली. हाच तो सारंगपूरचा मारुती होय. तेथे दगडावर समर्थांची एक सवाई कोरलेली आहे.

**'श्रीरामभक्ती मूळ रे । प्रसन्न सानुकूळ रे'**
**समर्थ तो तयागुणे। तयास सर्व ठेंगणे।।**

इंदूर बोधन चे पहिले महापति 'उद्धवस्वामी' होते. हे दोन्ही मठ निजामाबादला आहे. सारंगपूर निजामाबादहून ५ किमी. वर आहे. उद्धव इंदूरबोधनला शिवराम नावानी राहिल्याचा उल्लेख समर्थप्रतापात सापडते.

गुरुशिष्य परंपरा - समर्थ - उद्धव - माधव - गोविंद - अनंत - नारसिंह - रामचंद्र - जयराज - आत्माराम - वामन - राजारामबुवा- केशवबुवा

**३. <u>आपचंद मठ</u> :-** हे गुलबर्गा जिल्ह्यात असून कर्नाटक राज्यात आहे. कल्याणस्वामींचे शिष्य शिवराम स्वामी या मठाचे संस्थापक आहेत. शिवरामांनी इ.स. १७२६ मध्ये समाधी घेतली.

**४. <u>शिरगावचा मठ</u> :-** याचे मठपती 'भीमस्वामी' होय. गुरूपरंपरा श्री समर्थ कल्याणचे धाकटे बंधू दत्तात्रेय-यांचे पूत्र राघव- यांचे पुत्र यशवंत-त्यांचे पुत्र भीम अशी होय. येथे समर्थांनी मारुतीची स्थापना केली आहे. दत्तात्रय स्वामींनी येथे हनुमान जयंतीचा उत्सव सुरू केला व शिरगाव हे चाफळपासून जवळच ५-६ किमी. आहे.

**५. <u>डोमगावचा मठ</u> :-** डोमगाव हे परांड्याहून २५-३० किमी. वर आहे. हे बार्शी तालुक्यात येते. समर्थांच्या आज्ञेवरून धर्म प्रसाराकरिता कल्याणस्वामी डोमगावला येऊन राहीले. येथील गुरु शिष्य परंपरा श्री समर्थ कल्याण मुद्‌गल रामाजी. येथे

ग्रंथराज दासबोधाची मूळ प्रत आहे. येथे कल्याण स्वामींची वालूकामय समाधी व त्यावर असलेल्या पादुका व शिवलिंग होय. कल्याणस्वामींची जपाची माळ येथे आहे. केशवस्वामींच्या हातची सोनेरी रूपेरी शाईतील दासबोधाची प्रत डोमगावमध्ये आहे. उत्तम अक्षर यावे यासाठी समर्थांनी झोळीतून काढून दिलेला कित्ता डोमगावमठात आहे. कल्याण स्वामींची एकमेव सवाई अशी आहे. अर्थात त्यांचे इतर वाङ्मय १४४६ ओवी संख्याचे आहे.

**रामनामाचा कडकडाट। भवसिंधुस पायवाट। पायरीकरून वैकुंठ। होती प्रविष्ट परब्रह्मी।।१।।**

**रामनामांकित नर। बुडवूं नशके भवसागर। श्रीराममुद्रांकित मी वानर। सुखेपरपार पावलो।।२।।**

**नित्यश्रीरामनामस्मरण। तेथे विर्य धैर्य कल्याण। ब्रह्मपावती सनातन। हे महिमान स्मरणाचे।।३।।**

**जेथे श्रीराम विस्मरण। तेथे अकीर्ती अपेश अकल्याण। अतिनिंद्यते पापीपूर्ण। अध:पतन महानर।।४।।**

**यालागी साक्षपे आपण। समूळ सांडावे विस्मरण। नित्यकरिता श्रीरामस्मरण। कीर्तीकल्याण निज विजयी। म्हणावा जय जय राम।।५।।**

**६. <u>तीसगावचा मठ</u> :–** हे गाव अहमदनगर जिल्ह्यात येते. हे गाव पूर्वेस ५० किमी आहे. जवळच पुरातन शिवालय आहे व मच्छिंद्रनाथांची समाधी आहे. या मठाचे मठपति दिनकर स्वामी होते. दिनकर स्वामी हे मूळचे भिंगार गावचे. भिंगार हा अहमदनगरचा भाग म्हणला जातो. त्यांचे मूळ नाव दिनकर नरहर पाठक. यांनी स्वानुभव दिनकर हा ग्रंथ लिहिला आहे. मठ परंपरा– दिनकर–रामचंद्र–बाबाजीबुवा–नारायणबुवा–राजाराम–रघुनाथ–रामकृष्ण–सीताराम–भास्कर–प्रकाश. त्यावेळेस रामचंद्र १५–१६ वर्षांचे होते. शिवरामानंतर ते आपचंद मठाचे अधिपती झाले. येथे दासबोधाचे पारायण होते. रामनवमीचा उत्सव ४ दिवस साजरा करतात. आजुबाजूला गावातून दिंड्या येतात. एकादशीला मठातून पालखी निघते. ती वेणीतोरा नदीपर्यंत जाऊन परत येते. सध्या विद्यमान 'रामस्वामी' हे मठाचे कार्य चालवितात.

**७. <u>टाकळीचा मठ</u> :–** या मठाचे अधिपती पण उद्धवच होते. टाकळी हे गाव नाशिकहून ४–५ किमी. आहे. रथसप्तमीचे दिवशी या मठातून समर्थांच्या पादुका नंदिनी आणि गोदावरी नदीच्या संगमावर जाऊन तेथे पूजा करतात. या दिवशी समर्थांनी त्यांची तपश्चर्या सुरू केली होती. संगमी तीरावर जाताना समर्थांच्या ओव्या, सवाया, आरत्या म्हणतात. टाकळी येथे उद्धवांच्या परंपरेने किर्तनाच्या आरंभी व शेवटी नमस्कार करण्याची पद्धत आहे. या मागची घटना अशी सांगितली जाते की, 'उद्धव समर्थांच्या आज्ञेनुसार भजनात मग्न झालेले होते. समर्थ स्वत: श्रोत्यात बसले होते. त्यांचे चित्त सुद्धा सद्‌गुरु मूर्तीत, म्ह.हनुमनात लिन होते. उद्धव कीर्तन म्हणत. टाळ चिपळ्या वाजवित, श्रोत्यातून फिरत असताना समर्थांचे लक्ष त्यांच्या हरमूजी मेखळेकडे कडे गेले. ती त्यांना शेंदूराने माखलेली दिसली. शेंदूर कसा लागला या विचाराने मागे वळून पाहतो तो स्वत: मारुती राया उभे असलेले त्यांना दिसले. हे दृष्य पाहताच समर्थ उभे राहीले. सर्व श्रोतेगण पण उभे राहीले तेव्हापासून समर्थांनी उद्धवाला आज्ञा केली की कीर्तन समाप्त करून मागे नमस्कार करावा. कीर्तनाच्या आरंभी व शेवटी मारुतीरायाला वंदन करावे. दासविश्राम धामामध्ये या अर्थाची ओवी सापडते.

**उद्धवबाबा थोर महंत। ज्याचे कीर्तनी नाचे हनुमंत।**
**पाळुनिया आज्ञा समर्थ। टाकळी माजी राहीला।। ६६–२०**

उद्धवानंतरचे मठपति भीममहाराज नानासाहेब पेशव्यांना भेटले होते. त्यांनी टाकळी मठाची माहिती दिली. श्रीमंत पेशव्यांनी भीम महाराज्यांना टाकळी गावची सनद अर्पण केली. धनत्रयोदशी शके १६७५ ऑक्टोबर इ.स. १७५३ मध्ये ही सनद दिली होती. येथील गुरु शिष्य परंपरा श्री समर्थ–माधव–केशव–उद्धवसूत अंदाजे काळ शके १६३० ते १७००.

**८. <u>एक्केहाळी मठ</u> :–** कल्याणस्वामींच्या परंपरेतील आत्माराम या मठाचे अधिपती होते. हे गाव मेदक जिल्ह्यात आहे. या मठातील एक मूळ प्रत श्री समर्थ वाग्देवता मंदिरात १८४३ या क्रमांकाचे ठिकाण आहे. श्रीदासविश्रामधाम या ग्रंथाचे कर्ते आत्माराम होय. त्यांची गुरु शिष्य परंपरा अशी श्री समर्थ–कल्याण–शिवराम–रामचंद्र–आत्माराम.

**९. <u>उंब्रज</u> :–** हे गाव पुणे सातारा रोडवर साताऱ्याहून ४० किमी. वर आहे. समर्थ चाफळला असताना उंब्रजला रोज कृष्णातटाकी स्नानाला जात असत. उंब्रज ते चाफळ हे अंतर ९ किमी. आहे. येथे समर्थ स्थापित मारुती आहे. त्याची स्थापना शके १५७१ मध्ये झाली. मूर्तिच्या स्थापनेनंतर सतत १३ दिवस समर्थांनी कीर्तन केले. केशवस्वामी हे या मठाचे मठपति. गुरु–शिष्य परंपरा अशी–

समर्थ–कल्याण–केशव–मल्हार–केशव–रामचंद्र–हनुमंत–सीताराम–हनुमंत–रामकृष्ण

**१०. <u>मिरजेचा मठ</u> :–** हा मठ श्रावण वद्य पक्षात शके १५७८ मध्ये स्थापित झाला. ह्या स्थापनेच्या मागे इतिहास आहे. तो असा, समर्थांचे शिष्य जयराज मिरजेला कीर्तन करायचे. त्यावेळी मिरजेला अदिलशाही सरदार दिलील खानची सत्ता होती. हा सरदार जरा जास्तच धर्मवेडा होता. कोणत्याही ब्राह्मण, धार्मिक व्यक्तीला तो संकटात टाकणारे प्रश्न करायचा. उदा. देवाचे दर्शन मला घडव. नाहीतर त्याचे कीर्तन करू नको. मी तुला तुरुंगात टाकेन वगैरे वगैरे. एकदा जयरामाचे किर्तन सुरू असताना तो त्यांच्या कीर्तनात सामिल झाला व कीर्तनानंतर त्यांना वेडेवाकडे देवासंबंधी प्रश्न विचारले. 'मनुष्याला सत्संग घडला तर रामाचे दर्शन घडते?' या जयरामाजीच्या वाक्यावर त्याचा अक्षेप होता. हे जयरामजीला सिद्ध न करता आल्याने दिलील खानाने त्यांना तुरुंगात टाकले. समर्थांना ही बातमी लागली तेव्हा ते मिरजेला गेले व कीर्तन करायला लागले. दिलील खानाने मागची गोष्ट पुन्हा समर्थांच्या वेळी केली. समर्थ त्याला म्हणाले की, मी तुला रामाचे दर्शन घडवितो पण तुला मी जसे करेन तसे करावे लागेल. त्यासाठी दिलील खान तयार झाला. समर्थ दैवी शक्तीने सिद्धीद्वारे बुरूजाचे खिडकीतून पटकन बाहेर आले. दिलील खानाला त्या लहानश्या खिडकीतून बाहेर येणे काही जमले नाही. तो समर्थांना शरण गेला. त्याने समर्थांची माफी मागितली. जयरामला तुरूंगातून मुक्त केले. ब्राह्मणपूरी येथील जमीन त्याने समर्थांना दिली. येथेच हा मिरजेचा मठ उभा आहे. मिरजेच्या मठाचे अधिपत्य श्री समर्थांनी 'वेणाबाईला' करायला दिले. त्यांनी आपली कुबडी व पादुका पण वेणाबाईंना दिल्या. त्या मिरजेच्या मठात ठेवल्या आहेत. मठाची परंपरा अशी आहे.




श्री समर्थ–वेणाबाई–बयोबाई–अक्काबाई–गोविंद बिडकर–रामाजी गोसावी–अप्पाजी गोसावी–पुत्र सखाराम गोसावी–राजारामस्वामी–विठ्ठलस्वामी–कौस्तुभस्वामी.

**११. <u>लवथळेश्वर मंदिर</u> :–** पुणे–जेजुरी रस्त्यावर जेजुरीच्या आधी १ किमी. वर लवथळे हे छोटेसे गाव आहे. येथे शंकराचे मंदिर आहे. या मंदिराची आख्यायिका अशी की कोणी रात्री तेथे मुक्कामास गेले तर दुसऱ्या दिवशी याचा मृतदेह दिसायचा. समर्थ एकदा फिरता फिरता लवथळेला मुक्कामी गेले. रात्री शंकराच्या देवळात मुक्काम केला. गावकऱ्यांनी ते पाहिले. उद्या गोसाव्याचा अंत्यसंस्कार करावा लागेल या हेतूने गावकरी मंडळी मंदिरात गेली आणि पाहतात काय तर श्री समर्थ शंकराची पूजा करत आहेत. गावकऱ्यांना त्यांचे आश्चर्य वाटले. कदाचित या मंदिरात शंकराला उद्देशून त्यांनी शंकराची आरती म्हटली असावी.

**लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा। विषेकंठकाळा त्रिनेत्रीज्वाळा।।**

लवथळेश्वराच्या मंदिरात एका फलकावर समर्थांनी ही आरती लिहिल्याचे लिहून ठेवले आहे.

**१२. <u>बीडचा मठ</u> :–** हा गिरीधराचा मठ आहे. हनुमानस्वामींच्या बखरीत गिरीधर हे मूळचे मिरजेकडील तासगावचे राहणारे होते. ते गुरुच्या आज्ञेवरून ते बीड पासून १५–२० किमी. वर 'ईट' या गावी जाऊन राहीले. तेथेच त्याच्या मुख्य मठ आहे. स्वत: गिरीधरस्वामींनी काढलेली मारुतीची मूर्ति आहे. गिरीधरांना संपूर्ण दासबोध मुखोद्गत होता. त्यांनी सन १७२९–३० ला बीडला समाधी घेतली. गिरीधरांच्या ओव्या, श्लोक मिळून २४१३८ ओव्या आहेत. याचा उल्लेख कै.देवांनी समर्थावतार मध्ये केला आहे.

**१३. <u>कारंजा मठ</u> :–** कारंजा हे तालुक्याचे ठिकाण आहे. सुरुवातीस ते अकोला जिल्ह्यात होते आता ते वाशीम जिल्ह्यात गेले आहे. हे ठिकाण दत्ताचे कारंजे नृसिंहस्वामी सरस्वती यांचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. कोणी कारंजाला, कारंजा (दत्त) या नावाने सुद्धा जाणतात. येथे रामदासी परंपरेतील दोन मठ आहेत. एक बाळकरामाचा मठ, गुरुमंदीराचे बाजूलाच हा मठ आहे. कारंजा येथे बेंबळपाटावर मारुतीची स्थापना केली आहे. या मठातच रोकड रामाची समाधी व सांप्रदायिक राम मूर्ति आहे. मठपति खेडकर हे तेथेच राहतात. दुसरा मठ प्रल्हाद गोसावींचा म्हणविला जातो.

**१४. <u>सूर्जी अंजनगाव मठ</u> :–** हे गाव तालुक्याचे ठिकाण असून अमरावती जिल्ह्यात विदर्भात येते. येथील मल्हार गोसावी हे समर्थांचे अनुग्रही होते. यांचा नातू उद्धवसूत यांनी रामदास चरित्र लिहिले आहे. या ग्रंथात मल्हार गोसावी ह्यांची माहिति दिली आहे. लग्नानंतर मल्हारी बाबा यांना विरक्ति आली. यात्रेच्या निमित्ताने ते भीमातीरी पेडगावला आले. तेथे त्यांना समर्थांचे दर्शन व अनुग्रह प्राप्त झाला. तिकडे त्यांचे वडील त्र्यंबकपंत मुलाच्या शोधाकरिता, सुनेला बरोबर घेऊन सज्जनगडाला येऊन पोहोचले.

समर्थांना त्यांनी सर्व हकीगत सांगितली. पण मल्हाररावांनी मला कोणी नसल्याचे सांगितले होते. तेव्हा समर्थांनी त्यांची कानउघडणी केली व परत संसार करण्याचे सांगून परत पाठविले. पण मल्हाररावांचे मन संसारात रमेना. तेव्हा त्यांनी काशीवास स्वीकारला. तेथे त्यांनी राम, लक्ष्मण, सीता, हनुमंताच्या मूर्ति घडविल्या. पुढे त्या मूर्ति त्यांनी अंजनगाव सूर्जीला पाठविल्या व आपण संन्यास घेतला. रामनवमी, दासनवमीचे उत्सव अंजनगावला सुरू झाले. येथील वंश परंपरा अशी आहे

त्र्यंबकपंत-मल्हार गोसावी (समर्थ अनुग्रहीत)-उद्धव-उद्धवसुत (लक्ष्मण).

या उद्धवसुतांनीच रामदास चरित्र लिहिले आहे. त्यात ही माहिती उपलब्ध आहे. 'मला संपूर्ण वैराग्य द्यावे' ही ओळ त्याच्या अष्टकातीलच आहे.

**१५. <u>अंबिकाबाई राशीवडे व वाळवे मठ</u> :-** वेणाबाई मठपति व्यतिरिक्त स्त्री शिष्यामध्ये अंबिकाबाई ह्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात राशीवाडे येथे मठ स्थापित केला होता. त्या वाळवे मठाच्या देखील मठपति होत्या. राशीवडे हे गाव कोल्हापूर पासून १२-१५ किमीवर आहे. राशीवाडे मठाची व्यवस्था बावडेकर पंत अमात्य सरकार यांचेकडून होते.तत्पूर्वी वाळवेमठाकडून राशीवाडे मठाची व्यवस्था चालत असे. समर्थप्रताप ग्रंथात अंबिकाबाईचा उल्लेख आढळतो.

**अंबिकानामे कोरान्ने विजयपुरी। वातावर्ती पातली कृष्णातीरी।**<br>
**करवीर प्रांती हरिभक्ति बरी। शिष्य संप्रदाये केली हो।** ११.२० सप्र.

मठपरंपरा अशी होती. मल्हारबुवा-गिरिबुवा-व्यंकाजीबुवा-मोरेश्वर-बाळाजी-रामचंद्र-बलवंत-रघुनाथबुवा.

**१६. <u>कण्हेरी मठ (सातारा)</u> :-** पुणे सातारा हायवेवर आल्यावर खंडाळा नंतर उजवीकडे १२-१३ किमी. कण्हेरी गाव आहे. हे वाई तालुक्यात येते. कण्हेरीपासून वाई १६ किमी., भोर १८ किमी. व मांढरदेवी ७ किमी. आहे. वासुदेव गोसावी हे या मठाचे मठपति होय. यांचे मूळ नाव सदाशिवशास्त्री येवलेकर. ते काशीला अध्ययन करून आल्यावर त्यांना 'ग'ची बाधा जडली. प्रत्येकाला वादविवाद कर म्हणून आवाहन करीत नाहीतर मला 'जयपत्र' द्या असे म्हणत. हरवल्यास जीभ कापून देईन. असा त्यांचा बाणा होता. त्यांना समर्थांची भेट घेवून त्यांना वादविवाद करण्यास आवाहन केले. समर्थांनी त्यांना समजाविले आपण सर्व रामाचीच लेकरे आहोत. श्रींच्या भंडारात काय कमी आहे? पण शास्त्रीबुवा ऐकायला तयार नव्हते. हे पाहून समर्थांनी कल्याणला एका मोळीविक्याला बोलावून आणायला सांगितले. त्याने मोळी बाजूला ठेवून समर्थांना नमस्कार केला. समर्थांनी आपली कुबडी कल्याणला दिली व जमिनीवर रेख आखून, ती मोळीविक्याला तीनदा ओलांडायला सांगितली. त्यानंतर मोळीविक्याचे रुपांतर एका पंडितात झाले. तो शास्त्रार्थ करायला तयार झाला. हा चमत्कार पाहून सदाशिव शास्त्री चकीतच झाले. त्यांनी समर्थांना दंडवत घातला व शरण गेले. त्यांच्या विद्वत्तेचा अहंकार चूर झाला. धर्मस्थापनेच्या कार्यात आपण योगदान द्यावे. आज राष्ट्राला आपल्यासारख्यांची गरज आहे. शास्त्रीबुवांना आपली चूक लक्षात आली. त्यांनी समर्थांना शिष्य करून घ्या म्हणून विणविले. समर्थांनी ते मान्य करून त्यांचे नाव वासुदेवशास्त्री गोसावी ठेवले. शिरवळ जवळ कण्हेरी मठ स्थापन करून तेथील मठपति त्यांना बनविले. वाईला अफजल खानाची छावणी होती. अशा स्थितीत मठ स्थापित करणे हे एक मोठे धाडसच म्हणायचे. यास्तव त्यांना 'भीमस्वामी' (प्रति समर्थ) म्हटले जायचे.

**१७. <u>पसरणी मठ</u> :-** हे गाव वाई तालुक्यात आहे. वाईपासून ७-८ किमी. वाई महाबळेश्वर रस्त्यावर पसरणी फाटा लागतो. हा मठ रघुनाथ स्वामी यांनी स्थापन केला आहे. येथील गुरुशिष्य परंपरा अशी आहे

श्री समर्थ-वासुदेव गोसावी-माधव स्वामी-पुरुषोत्तम स्वामी-भीमस्वामी-रघुनाथस्वामी.

येथील राममंदिराची रचना सज्जनगडा सारखीच आहे. वर राममंदिर व खाली रघुनाथ स्वामींची समाधी.

**१८. <u>मर्ढे मठ</u> :-** पुणे सातारा रोड वर अनेवाडी टोलनाक्यापासून ३ किमी.वर आहे. चिंबगोवे फाट्यावर मर्ढे आहे. येथील मठपति वासुदेव स्वामी होते. त्यांनी मठ स्थापन करून विदेहस्वामी ह्यांची मठपति म्हणून नेमणूक केली.

**१९. <u>महिसगांव मठ</u> :-** मर्ढे मठपति अमृतेश्वर ह्यांनी महिसगाव मठ स्थापना केले आहे. या मठात रामनवमी, पुण्यतिथी, दासनवमी हे उत्सव साजरे होतात. महिसगाव हे सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात आहे.

**२०. <u>भुईंज मठ</u> :-** हे गाव पुणे सातारा रोडवर आहे. येथे समर्थांचे हातचे रामपंचायतन आहे.कण्हेरी मठाचे वासुदेव गोसावी ह्यांचे शिष्य वामनबुवा ह्यांचा हा मठ मानला जातो.

२१. **मादलमोही मठ** :– हे गाव गेवराई तालुक्यात बीड जिल्ह्यात येते. मादलमोही पासून ३–४ किमी. पालखनाथ नावाचा डोंगर आहे. मठाचे मूळ पुरुष हरिहरस्वामी होते. हे पालखनाथ डोंगरावर साधनेसाठी जात. गुरुशिष्य परंपरा अशी आहे. श्री हरिहरस्वामी (मठपति) – सीताराम – वासुदेव – नथुराम उर्फ रामनाथ – गोविंदपुत्र – देविदास – गोपीनाथ –सिद्धेश्वर – गोविंद



हेळवाकची घळ

## घळी

डोंगरातील कडेकपारे, अवघड जागा जी डोंगराच्या आकारानेच तयार झाली असून आता आश्रयासाठी राहता येते. जाण्याचा/बाहेर निघण्याचा मार्ग हा अवघड असून शरीराला वाकून, झुकून, जावे लागते. कृष्णानदीच्या काठी डोंगराचा भाग असल्याने तेथे अनेक घळी आहेत. त्या घळीचा उपयोग समर्थांनी व शिवरायांनी जगाच्या कल्याणाकरिता केला. त्या एकातांत परमेश्वराचे चिंतन, मनन, लेखन सर्वच चालायचे. राजकारणाची तजविज असो, गुप्त भेट असो की आश्रयस्थान अशा प्रकाराने घळीचा उपयोग होत होता. शिवथर घळ ही सर्वात प्रसिद्ध घळ मानली जाते. जेथे दासबोधाची रचना झाली. याचे वर्णन तर आलेलेच आहे. श्री समर्थांना घळीत राहणे आवडायचे. समर्थांच्या घळीला 'रामघळ' म्हटले जात असे. निसर्गसानिध्यात, डोंगरादरीत या घळी असल्याने ह्या निसर्गरम्य व मनोहर आहेत.

१. **हेळवाकची घळ** :– हेळवाक हे गाव कऱ्हाडहून चिपळूणकडे जाणारी कोयना नदीच्या काठाकाठाने गेल्याने लागते. तेथून अरण्यात गेल्यावर ही हेळवाकची घल लागते. पाटणच्या पलिकडे कुंभारली घाटाच्या तोंडाशी 'हेळवाक' म्हणून लहानसे खेडे आहे. हेळवाकच्या दक्षिणेस एक दोन लहान डोंगराच्या पलिकडे कोंडवळे नावाचे खेडे आहे. तेथून अर्धा कि.मी. अंतर चालून गेल्यावर हेळवाकची घळ दृष्टीस पडते. शके १५९६ चा चार्तुमास समर्थांनी येथे काढला होता. ही घळ समोरून १५–२० फूट उंच असून घळीत जाण्याला दोन्ही बाजूंनी मार्ग आहे. या घळीला पाच दालने केलेली आहेत. घळीचा आकार चंद्रकोरी प्रमाणे आहे. लांबी १५० इंच, रुंदी २० ते २० फूट वरून धबधबा कोसळीत असतो. शके १५९६ मध्ये कडाक्याच्या थंडीमुळे समर्थ हे हेळवाकहून घोड्यावर स्वार होऊन चाफळला आले. चाफळला राहून रघुनाथ भट ह्यांना हेळवाकच्या घळीत पाठवले होते. नंतर समर्थांनी त्यांना स्वहस्ते एक गद्य पत्र पाठवले होते. हे गद्य पत्र उपलब्ध आहे. हेळवाकला समर्थांचे तुकोबा नावाचे शिष्य राहत होते.



मोरघळ

२. **तारळे (तोंडोशी) घळ** :– तोंडोशीच्या घळीला तारळ्याची किंवा कळंब्याची घळ देखील म्हणतात. ही सर्व गावे जवळजवळ आहेत. घळ १०० ते ११० फूट लांब, २५ फूट रुंद, व ८ फूट उंच आहे. घळीत दहा महिने पाणी झिरपत असते. सातारा कऱ्हाड मार्गावर काशीळ जायचे तेथून उजवीकडे वळल्यावर, उजव्या हाताला शमनागीर पीराची टेकडी व खंडोबाची पाली आहे. डाव्या हाताला शिरगाव रस्ता जातो. तारळ नदी पुलाने ओलांडून गेल्यावर तोंडोशी गाव लागते.



रामघळ, चाफळ

३. **मोर घळ** :– सातारा ठोसेघर २३ किमी. तेथून तास पठारावरून चालत गेल्यास मोरघळीला जाता येते. ही घळ काहीशी गुढ व गंभीर वाटते. किती आत आहे याचा अंदाज येत नाही. गुराखी सांगतात एकदा बैल आत गेला तर परत आलाच नाही. शाळांची ट्रिप तेथे गेली, मास्तर घळीत गेले तर बेशुद्ध पडले. प्राणवायुची कमतरता असावी. पण ह्या ऐकीव गोष्टी आहेत. मोरघळ समोरून १२–१५ फूट उंच आहे. आतील थांगपत्ता लागत नाही.

**४. <u>चाफळची रामघळ</u> :–** इथे कुबडी तीर्थ आहे. शिवरायाची व समर्थांची पहिली भेट शिंगणवाडीच्या मारुतीजवळ झाली. तेथे आज 'शिवसमर्थ' म्हणून पक्के बांधकाम केलेले स्मारक उभे आहे. आजुबाजुला सुंदरसा बगीचा केला आहे. तेथुन पुढे ७–८ किमी. गेल्यावर भैरववाडी लागते. इथे भैरोबाचे मंदिर आहे. येथून वर चढत गेल्यावर 'रामघळ' लागते. कल्याणला सर्पदंश होऊन भैरवाला ११ मण गुळाचा नैवेद्य बोललेली ही घटना भैरववाडीलाच झालेली आहे. येथे बाजूला एक ओढा जातो. राजे व समर्थ येथे एकदा भेटले असता राजांना तहान लागली होती. तेव्हा समर्थांनी कुबडीने एका दगडाला बाजूला करून तेथून हा पाण्याचा झरा प्राप्त झाल्याचे सांगतात.

**५. <u>सज्जनगडची रामघळ</u> :–** सज्जनगडाच्या पायऱ्या चढत असताना गाय–मारुती हे ठिकाण आहे. तेथे कडाच्या काठाने ५००–६०० फूट वर आले की ७–८ पायऱ्या लागतात. त्या पायऱ्या चढून गेल्यावर ३–४ फूट उंचीचे व २० फूट लांबीचे विवर आहे. यातून रांगत जावे लागते. मग उजवी ७ फूट लांब, ७ फूट रुंद व ५ फूट उंचीची जागा आहे. ही सज्जनगडची रामघळ होय. इथे समर्थ ध्यानाला बसत.

**६. <u>चंद्रगिरीची घळ</u> :–** उंब्रजहून चाफळकडे जाताना मधे 'चरेगाव' लागते. चरेगावच्या पाठीशी चंद्रगिरीचा डोंगर असून त्यात ही घळ आहे. त्यात एक वाघ राहत असे. त्याला हाकलून देऊन समर्थांनी तेथे काही काळ निवास केला होता. चरेगावपासून दक्षिणेस ३ किमी. कच्चा रस्ता आहे. खिंड ओलांडून गेल्यावर डावीकडे अर्धा तास चढ व पुढे चालत राहील्याने चंद्रगिरीची घळ दिसते. येथून जवळच वसंतगड आहे. ही घळ ८ मीटर लांब, ५ मीटर रुंद आहे.

**७. <u>जरंडेश्वराची घळ</u> :–** साताराहून कोरेगावला जाताना जांब फाटा लागतो. त्या फाट्याला डावीकडे वळून पायथ्यापर्यंत जायचे. साधारणपणे १५–१६ किमी. अंतर आहे. येथुन दीड तासाची चढण चढून गेल्यावर जरंडेश्वर लागते. जरंडेश्वराला जुने मारुती देवालय असून त्याचा आता जीर्णोद्धार झालेला आहे. देवळाच्या मागे काही पायऱ्या उतरल्यावर ३–४ मोठे दगड एकमेकात अडकून एक छोटे खानी घळ तयार झाली आहे. हीच जरंडेश्वरची घळ. एक माणूस ध्यानाला बसू शकेल एवढी जागा तेथे आहे. जरंडेश्वर येथे श्रीसमर्थ व जयराज स्वामी वडगावकर यांची भेट झाली होती.

****

**१२. <u>श्री क्षेत्र महाबळेश्वर</u> :–** श्री समर्थ तीर्थाटन संपवून कृष्णा काठी इ. स. १६४५ मध्ये महाबळेश्वरला आले. कृष्णा नदीचा उगम येथे आहे. येथे पाच नद्यांचे उगमस्थान आहे. कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री व सरस्वती. या पंचगंगेच्या उगम स्थानाला श्री महाबळेश्वर क्षेत्र म्हणतात. दोन महादेवांची देवालये महाबळेश्वर व अतिमहाबळेश्वर आहेत.

कै. दिवाकर देशपांडे (गोसावी) व समर्थ यांची भेट पंचगंगेवर स्नानास गेले असताना झाली. समर्थांनी दिवाकर गोसावींकरीता मारुतीरायाची स्थापना केल्याचे समजते. कै. दिनकररावांनी काळ्या दगडाच्या चीपेवर, काळ्या कपिला गाईच्या गोमयात लुकण तयार करून श्री प्रताप मारुतीची मूर्ति तयार केली. त्याची प्राणप्रतिष्ठा वद्य दशमी रोज मंगळवार सन १६४५ (श. १५६६) समर्थांचे स्वहस्ते करून दिवाकर रावांना राममंत्र व हनुमान मंत्राचा उपदेश दिला. मंदिराजवळ दिवाकर गोसावी व मुलगा गोपाळ, नातू दिवाकर यांच्या समाधी आहेत. येथील अण्णा देशपांडेच्या वाड्यात पाच दुर्मिळ वस्तू आहेत. १. दासबोधाची शके १६०६ ची प्रत. २. समर्थांच्या पादुका ३. समर्थांची कुबडी ४. शिवाजी महाराजांनी वाघिणीचे दूध काढलेला तुंबा ५. श्री राम पंचायतन व षडचक्रांकीत शाळिग्राम. पुणे सातारा हायवेवर वाई–महाबळेश्वरचा फाटा उजव्या हाताला आहे. पुणे–महाबळेश्वर अंतर १२० किमी आहे.

**१३. <u>प्रतापगडचा मारुती व तुळजाभवानी –</u>** पोलादपूर ते महाबळेश्वर मार्गावर २४ किमी. वर वाडा गाव आहे. तेथे उतरून प्रतापगडला जावे लागते. समर्थ आपल्या रामजी व शामजी ह्या पुतण्यासह शिवाजी महाराजांच्या विनंतीनुसार प्रतापगडी काही दिवसांकरीता आले होते. किल्ल्याच्या दरवाजाजवळ समर्थांनी इ. स. १६७८ मध्ये स्थापित केलेला मारुती आहे. हा त्यांच्या हातचा शेवटचा मारुती समजला जातो. पहिला स्थापित मारुती टाकळीचा व प्रतापगडचा शेवटचा होय. तुळजाभवानी शिवाजी महाराजांची तसेच समर्थांची कुलदेवता होती. श्रेष्ठांनी तुळजापूरच्या भवानीला केलेला नवस फेडण्याकरीता समर्थ प्रतापगडावर गेले होते. प्रतापगडची तुळजाभवानी ही मोरोपंत पिंगळ्यांनी स्थापित केली आहे. शिवरायाचे ते कुलदैवत असल्याने तुळजाभवानी स्थापनेची प्रेरणा समर्थांनीच दिली असावी. खालील समर्थांच्या ओव्या या घटनेचा पाठपुरावा करतात.

**श्रेष्ठांची कामना होती पुरविली मनोकामना । नवस जो नवासिला होता तो त्यापासून चुकला ।।**
**तुळजापूर टाकोनी चालली पश्चिमेकडे । पारघाटी जगन्माता सद्य येवूनी राहिली ।।**

पारघाट हे प्रतापगडच्या पायथ्याशी आहे. वरील ओव्या तुळजापूरच्या भवानी स्तोत्रातील आहे. जे समर्थांनी प्रतापगडावर लिहिले.


डोळेगावचा मारुती

**१४. <u>डोळेगाव –</u>** चाफळ व सज्जनगड यांच्यामध्ये डोळेगाव हे लहानशे खेडे आहे. चाफळहून सज्जनगडला जाताना श्री समर्थ येथे थांबत असत. या गावात समर्थांनी मारुती स्थापना केली आहे. डोळेहिरा हा ओढा आहे. उरमोडी नदी आणि डोळेहिरा ओढ्याच्या संगमावर मारुतीची स्थापना केली आहे. या मारुतीला शेंदूर लावता मांझण लावतात. मांझण हे जाळलेल्या खोबऱ्याचे, खोबऱ्याच्या तेलात तयार केलेले मिश्रण आहे. डोळेगावच्या मारुतीची मान वाकडी आहे. त्यावर तेथील लोक एक आख्यायिका सांगतात. समर्थ सज्जनगडला जाताना व येताना मंदिरात थांबायचे. जाताना मागणे मागून निरोप घ्यायचे. निरोप घ्यायचे वेळी मारुतीने त्यांना मान हलवून निरोप दिला. त्यावेळेस मान वाकडी झाली. ती तशीच कायम राहिली. पण समर्थ व मारुती यांचा संबंध हा प्रत्यक्ष संबंध होता. त्यामुळे श्री समर्थ रामदासांना प्रत्यक्ष हुनमानाने निरोप दिलसा असावा, दगडाच्या मूर्तीने नव्हे.


आंगलाईची देवी

**१५. <u>आंगलाई देवी –</u>** सातारा रहिमतपूर रस्त्यावर १६ कि.मी. वर उजवीकडे एक फाटा फुटतो. तेथून ५ किमी. वर अंगापूर (बुद्रुक) हे गाव आहे. एके काळी हे कृष्णाकाठचे वैभवशाली तीर्थक्षेत्र होते. गावापासून २ किमी. वर कृष्णामाईचे प्रशस्त पात्र आहे. तेथे ब्रह्मपूरीचे लहानशे धरण आहे. तसेच कृष्णेचा डोह आहे. काठावर शिवनाथ मंदिर, देवी व शंकराचे देऊळ आहे. रहिमतपूरच्या रस्त्यावर पूल ओलांडून (कृष्णेचा पूल) धामणेर येथून डोहावर खाजगी वाहनाने जाता येते. श्रीराम मंदिर चाफळ येथील मंदिराचे बांधकाम सुरू असताना तेथे श्रीरामाची मूर्ति मूर्तीची स्थापना करावयास मूर्ति कोठून आणायची? ही चिंता समर्थांना होती. त्यावेळेस श्रीसमर्थांना स्वप्न दृष्टांत झाला. त्या प्रमाणे समर्थांनी या आंगलाईच्या डोहातील ब्रह्मकृत मूर्ति व अंगलाई देवीची मूर्ति काढली. ही मूर्ति जेव्हा समर्थांनी चाफळला न्यायचे हे गावातील लोकांना सांगितले तेव्हा गावकरी म्हणायला लागले की, या गावची मूर्ति याच गावी स्थापित व्हावी. तेव्हा समर्थांनी जशी तुमची इच्छा म्हणून 'मूर्ति घेऊन जा' असे म्हटले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, ती मूर्ति गावकऱ्यांना हलविता येईना. शेवटी गावकरी निराश होऊन समर्थांना शरण गेले व मूर्ति चाफळच्या मंदिरात स्थापन करण्यास घेऊन जा असा आग्रह केला. चाफळला श्रीरामाच्या मूर्तिची प्राणप्रतिष्ठा होऊन स्थापित करण्यात आली. अंगलाई देवीची मूर्ति सज्जनगडावर स्थापित आहे.

**१६. <u>वाई –</u>** पुण्याहून महाबळेश्वरला जातना वाई हे गाव लागते. वाईला कृष्णेच्या काठी असलेले महागणपती मंदिर फार प्रख्यात आहे. पैठण, काशी ह्या क्षेत्रा इतके महत्त्व त्यास होते. कृष्णेच्या वरच्या अंगाने जो रस्ता जातो त्या रस्त्यावर हा मारुती आहे. श्री समर्थ महाबळेश्वरहून वाईला आले होते. त्यांनी थिटे, पितके , चित्राप यांना अनुग्रह दिला होता. कल्याणांच्या नंतर डोमगावचे मठपती झालेले मुदगल उर्फ मधोबा हे या चित्राव घराण्यातील तसेच वाईचे जुने देशपांडे घराण्यातील शंकराजी पंत व त्यांची मुले शिवराय, बहिराव उर्फ बहिराव व कृष्णाजी हे चौघेही कल्याणांचे शिष्य होते.

****



श्री कल्याण स्वामी यांनी स्वहस्ते रेखाटलेले
श्री वीर हनुमानांचे चित्र (बाड क्र.५१)